सन २०१७-१८ टंचाई अंतर्गत बार्शिटाकळी नगरपंचायतीच्या तात्पुरत्या पुरक नळ पाणी पुरवठा योजनांना प्रशासकीय मान्यता देणेबाबत...

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांकः टंचाई २०१८/प्र.क्र. ८३ /पापु १४
जी. टी. रुग्णालय संकुल इमारत, ७ वा मजला,
मंत्रालय, मुंबई ४०० ००१
तारीख: २५ एप्रिल, २०१८

<u>वाचा -</u>

१) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक: टंचाई २००८/प्र.क्र. १४९/पापु १४, दिनांक २१.०८.२००९
२) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक: टंचाई २०१६/प्र.क्र.१४३/पापु १४, दिनांक ४.५.२०१६
३) विभागीय आयुक्त, अमरावती यांचे क्रमांक जा.क्र : प्रासंनप/सलेअ/कावि-४२/२०१८ दिनांक १३.०४.२०१८ चे पत्र.
४) शासन पत्र क्रमांक बैठक २०१७/प्र.क्र. १७० /पापु १४, दिनांक २४ एप्रिल, २०१८ (बैठकीचे इतिवृत्त)

<u>प्रस्तावना -</u>

विभागीय आयुक्त, अमरावती यांनी सन २०१७-१८ च्या टंचाई कालावधीसाठी टंचाई उपाय योजनेंतर्गत बार्शीटाकळी नगरपंचायतीच्या १) इंदिरा आवास नगर येथे तात्पुरती पुरक नळ योजना, २) नाईक नगर, फुले नगर येथे तात्पुरती पुरक नळ योजना, ३) इंदिरा नगर येथे अस्तिवात असलेल्या सार्वजनिक विहीरीचे खोलीकरण व तात्पुरती पुरक नळ योजना व ४) नगर पंचायत क्षेत्रातील हातपंप दुरुस्तीद्वारे पाणी पुरवठयाची कामांचा समावेश असलेला रुपये ३०.६४ लाख किंमतीचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. सदर प्रस्ताव पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ नागरी व ग्रामीण क्षेत्रातील विहित आर्थिक व भौतिक निकषाबाहेरील तात्पुरत्या पाणी पुरवठा योजना / उपाययोजनांना प्रशासकीय मंजूरी देण्यासाठी अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या स्थायी समितीच्या दिनांक २३.०४.२०१८ रोजी झालेल्या बैठकीत विचारात घेण्यात आला.

स्थायी समितीच्या दिनांक २३.०४.२०१८ रोजी झालेल्या बैठकीत या प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन प्रस्तावनेत नमुद केलेली वस्तुस्थिती विचारात घेऊन १) इंदिरा आवास नगर येथे तात्पुरती पुरक नळ योजना, २) नाईक नगर, फुले नगर येथे तात्पुरती पुरक नळ योजना व ३) इंदिरा नगर येथे अस्तिवात असलेल्या सार्वजनिक विहीरीचे खोलीकरण व तात्पुरती पुरक नळ पाणी पुरवठा योजनांच्या प्रस्तावास मंजूरी देण्यात आली. नगर पंचायत क्षेत्रातील हातपंप दुरुस्तीची कामे नगर पंचायतीच्या स्वनिधीतून करावीत असा बैठकीत निर्णय घेण्यात आला. त्या अनुषंगाने सदर प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

प्रस्तावनेत नमुद केलेली वस्तुस्थिती विचारात घेऊन १) इंदिरा आवास नगर येथे तात्पुरती पुरक नळ योजना, २) नाईक नगर, फुले नगर येथे तात्पुरती पुरक नळ योजना व ३) इंदिरा नगर येथे अस्तिवात असलेल्या सार्वजनिक विहीरीचे खोलीकरण व तात्पुरती पुरक नळ योजनेच्या रुपये २२.४६ लाख (रुपये बावीस लाख, शेहेचाळीस हजार फक्त) किंमतीच्या प्रस्तावास खालील अटींच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे :-

१) जिल्हाधिकारी, अकोला यांनी बार्शीटाकळी शहरात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली असल्याचे सर्वप्रथम घोषित करावे.

२) सदर प्रस्तावात नमूद केलेली पूरक नळ पाणी पुरवठा योजनांना नगर पंचायत बार्शिटाकळी यांचेमार्फत राबविण्यात यावी.

३) सदर योजनांची कामे विहित पध्दतीने ई-निविदा मागविण्यात येऊन करावीत. योजनांची कामे मान्यता प्राप्त किंमतीमध्येच पूर्ण होईल याची दक्षता घ्यावी.

४) योजनांची निविदा अल्प मुदतीची (७ दिवस) काढण्यास परवानगी देण्यात येत आहे.

५) निविदा प्रक्रीया दिनांक ११ मे , २०१८ पर्यंत पूर्ण करुन कार्यारंभ आदेश देणे आवश्यक आहे.

६) निविदा प्रक्रीया दिनांक ११ मे, २०१८ पर्यंत पूर्ण न झाल्यास योजनांची मान्यता रद्द समजण्यात येईल.

७) योजनांची कामे दिनांक २५ मे, २०१८ पर्यंत पूर्ण करुन योजनेतून पाणी पुरवठा सुरु होणे आवश्यक आहे. तथापि, या दिनांकापर्यंत योजनेतून पाणी पुरवठा सुरु न झाल्यास योजनेची मान्यता रद्द करण्यात येईल.

८) सदर योजनांची प्रस्तावात नमूद केलेली कामे नगर पंचायत, बार्शिटाकळी यांच्यामार्फत पूर्ण करण्यात आल्यानंतर योजनांची देखभाल दुरुस्ती व योजनांचे व्यवस्थापन संबंधित नगर पंचायती मार्फत करणे आवश्यक राहील.

९) विभागीय आयुक्त, अमरावती यांनी सदर योजनेकरिता निविदा प्रक्रिया झाल्यानंतर योजनेच्या सुरुवातीला ५०% इतका निधी द्यावा. उर्वरित निधी योजना कार्यान्वित

झाल्यानंतर देण्यात यावा.

१०) टंचाई कालावधीनंतर या उपाययोजनेचा वापर होणार नसेल तर उपाययोजनेसाठी वापरण्यात आलेले फ्लोटींग पंप (Floating Pump) व पाईप्स काढून ठेवून ते नगर पंचायत, बार्शीटाकळी यांच्या ताब्यात ठेवणे आवश्यक आहे. जेणेकरुन आवश्यकतेनुसार पुढील टंचाई कालावधीत त्यांचा वापर याच ठिकाणी अथवा अन्य ठिकाणी करणे शक्य होईल.

१२) योजनांची कामे मुदतीत पूर्ण होणे आवश्यक असल्याने योजनांच्या निविदा प्रक्रीयेपासून ते योजनांमधून पाणीपुरवठा सुरु होईपर्यंत आठवडयाच्या प्रत्येक सोमवारी प्रगती अहवाल शासनास पाठविण्यात यावा.

२. याबाबत होणारा खर्च मागणी क्र. सी-६, २२४५ नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य, ०१-अवर्षण, १०२ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, ९१ - राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकानुसार खर्च, (९१)(०१) पिण्याच्या पाण्याचा आकस्मिक निकडीचा पुरवठा (२२४५००९३) (दत्तमत) (वेतनेत्तर) - ३१, सहाय्यक अनुदाने या लेखाशिर्षाखालील तरतूदीमधून भागविण्यात यावा व त्याखाली अंतिमत: खर्ची टाकण्यात यावा.

३. हा शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ नागरी व ग्रामीण क्षेत्रातील विहित आर्थिक व भौतिक निकषाबाहेरील तात्पुरत्या पाणी पुरवठा योजना / उपाययोजनांना प्रशासकीय मंजूरी देण्यासाठी अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या सचिवस्तरीय स्थायी समितीच्या दिनांक २३ एप्रिल, २०१८ रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४२५१०१६२५७२२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Mahesh Bhagwan Sawant

Digitally signed by Mahesh Bhagwan Sawant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply and Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d1f670a17d77c8ddff69694de2a07b7ff855dafef954aefa82ca28bd6cc6adb6, cn=Mahesh Bhagwan Sawant
Date: 2018.04.25 17:43:16 +05'30'

(महेश सावंत)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखाकार, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई

२. महालेखाकार, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-२, नागपूर
३. अपर मुख्य सचिव, (म.व पु.) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
४. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
५. प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
६. सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
७. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, नवी मुंबई
८. विभागीय आयुक्त, अमरावती
९. जिल्हाधिकारी, अकोला
१०. मुख्याधिकारी, नगर पंचायत, बार्शिटाकळी, जि. अकोला
१० अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्वीय सहायक
११ उप सचिव (पापु १४) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्वीय सहायक
१२ पापु १४ (निवडनस्ती)